# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

ईमेलद्वारे/महत्वाचे/कालमर्यादा

क्र. संकिर्ण - २२२२/प्र.क्र.०२/प्रनिप्रा/३५४ दिनांक : ८ फेब्रुवारी, २०२२

## परिपत्रक

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाची "प्रक्रिया शुल्क" अदा करण्याबाबत.**

**संदर्भ :** १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय.

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने, कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेप्रकरणी आकारण्यात आलेले प्राधिकरणाशी संबंधीत “प्रक्रिया शुल्क” सोबत जोडलेल्या सुत्रानुसार http://www.maha-ara.org/ara/index.php या लिंकवरुन महाविद्यालयाच्या कॅप साठीच्या लॉगीन मधून (पेमेंट गेटवेद्वारे) अदा करावयाचे आहे.

प्राधिकरणाकडील प्रक्रिया शुल्काचा भरणा विहित कालावधीमध्ये न केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही व तद्नुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यता प्राधिकरणाने नाकारल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालय/संस्था यांची राहील, याची कृपया गांभीर्याने दखल घ्यावी.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

सही/-
(रविंद्र जगताप) भा.प्र.से.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,
मुंबई

सहपत्र : वरीलप्रमाणे

D:\मुक्ता\शैक्षणिक वर्ष २०२१-२२\प्रवेश प्रक्रिया शुल्क.docx

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
व्यावसायिक अभ्यासक्रमांची संबंधीत सर्व महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४) संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई.
५) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६) संचालक/सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे.

प्रत माहितीकरिता सादर,-

१) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सर्व परिक्षा समन्वयक/सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२) परिक्षा सल्लागार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
४) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक.
५) प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी.

# Admissions Regulating Authority, Mumbai

## Processing Fees Statement for Academic Year 2021-22

| CAP Quota (Total Seats) | Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc. | Total (1+2) | Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/- | No. Institutional / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/- | No. of Actual NRI admissions x Rs. 3000/- | Total Processing Fees (Column No. 4+5+6=7) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | | | | | |

*******